ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# वाङ्मयेतिहासाची आवश्यकता




प्रा. डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर, जि. पुणे.

काळ बदलला की परिस्थती बदलते. परिस्थिती बदलली की समाज बदलतो. समाज बदलला की माणसाचे जीवन बदलते. या बदलत्या काळाची बदलती जीवन पध्दती ही इतिहासात रुढ होत असते. जसे मराठी साहित्यात शिलालेख, ताम्रपटापासून संतांच्या साहित्यापर्यंतचा इतिहास हा काळाबरोबर बदलत गेला आहे. शिवकाळ, पेशवेकाळ, आंग्लकाळ, स्वातंत्र्योत्तर कालखंड यामध्ये सातत्याने बदल होत गेले. त्या बदलांचा परिणाम मराठी साहित्यावर झाला. या बदलांचा वेध घेणे आवश्यक असते. कारण बदलत्या स्थित्यंतराचा वेध घेणे ही काळाची गरज आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्य हे बदलत गेलेले दिसते. या बदलत्या काळातील वाङ्मय हा इतिहासाचा एक अविभाज्य भाग बनलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक साहित्य प्रवाहाचा उदय झाला. अनेक साहित्याचे प्रवाह जन्माला आले. या सर्वांची नोंद घेणे आवश्यक ठरते. म्हणूनच वाङ्मय इतिहास लेखन हे महत्वपूर्ण भूमिका बजावताना दिसते. कालौघात साहित्याची रचना, आकृती बंध, ध्येयधोरण बदलत गेलेली पहावयास मिळतात. त्याचा समाजमनावर परिणाम होतो. त्या परिणामाच्या वेधातूनच वाङ्मय इतिहास लेखन संकल्पना अस्तित्वात आली.

कोणतीही व्यक्ती, वस्तू वा घटना घेतली तरी ती भूत, वर्तमान आणि भविष्य या काळाशी संबंधित असतेच. काळाच्या या विविध प्रवाहातूनच त्या त्या व्यक्तीच्या व घटनेच्या विकासक्रमाची उत्पत्ती, स्थिती, गतीची जाणीव आपल्याला प्राप्त होते. इतिहास या शब्दाची व्युत्पत्ती पाहिल्यास तो पूर्णपणे भूतकालाधिष्ठित असल्याचे दिसते. कारण इतिहास हा भूतकालाधिष्ठित असला तरी त्याचा अन्वयार्थ लावला जातो. तो ज्ञानवंताच्या स्वकालीन ज्ञानाच्या, विचारांच्या जाणिवांच्या वा सांस्कृतिक गरजांच्या संदर्भात वर्तमानाप्रमाणे परिणामदृष्टया भविष्यकालाशीही इतिहासाचा संबंध येतो. प्रामुख्याने इतिहास कल्पनेत सामन्यत: अंतर्भाव होतो तो मानवी जीवनातील उपक्रमांचा तदनुषंगिक घडामोडींचा. या घडामोडीत अनेक भौगोलिक गोष्टींचा वाटा असतो. याच भौगोलिक गोष्टींचा त्या त्या ठिकाणी राहणाऱ्या मानवाच्या मनावर, संस्कृतीवर, चालीरीतींवर प्रभाव गाजविल्याचे आढळते. भौगोलिक गोष्टींबरोबर सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक गोष्टींचाही मानवावर परिणाम झाला. त्याचा परिणाम मराठी साहित्यावर झाला. आधुनिक मराठी वाङ्मयाचा अभ्यास करताना म. फुले, बाळशास्त्री जांभेकर, गो.ग. आगरकर, लोकहितवादी, इ. अनेक विचारवंतांनी आपल्यावर झालेल्या परिणामाचे चित्र मराठी साहित्यावर उमटले.

वाङ्मयेतिहासाची विद्या अवगत करुन घेऊन आपल्याला वाङ्मयेतिहासाच्या रचनेला उपकारक ठरेल असा स्वत:चा स्वतंत्र संकल्पनाव्यूह निर्माण करावा लागणार आहे. कारण जगातिक स्तरावर आणि कलेच्या पातळीवर सर्व वाङ्मय जरी सारखेच असले तरी प्रत्येक भाषेतील प्रत्येक समाजातील प्रत्येक विशिष्ट गटातील वाङ्मयाचा स्वत:चा असा एक स्वभावधर्म असतो. चेहरामोहरा असतो. हा स्वभावधर्म,

चेहरामोहरा त्या त्या वाङ्मयेतिहासाचं केवळ सैध्दांतिक पातळीवर विचार न होता तो विशिष्ट वाङ्मयाच्या संदर्भातही होणे आवश्यक असते. याच दृष्टीने मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या रचनेला उपकारक ठरेल असा संकल्पनाव्यूह आपल्याला निर्माण करायला हवा. अर्थातच मराठी वाङ्मयासाठी असा संकल्पनाव्यूह निर्माण करण्याअगोदर सैधांतिक पातळीवर वाङ्मयेतिहासाची संकल्पना आपल्याला स्पष्टझाली पाहिजे.

मुळात वाङ्मय ही एक कला आहे. कलेच्या इतिहासाचे स्वरुप भौतिक शास्त्रांच्या इतिहासापेक्षा भिन्न असते. सामाजिक शास्त्रांच्या इतिहासाच्या स्वरुपापेक्षाही वेगळे असते. कारण सामाजिक शास्त्रांच्या रचनेत मानव, समाज आणि वर्तन संकेत यांच्या संदर्भात जी एक प्रकारची अनपेक्षितता आलेली असते त्याहीपेक्षा वेगळया स्वरुपाची अनपेक्षितता वाङ्मयादी कलांमध्ये उपस्थित असते.

कला समाजात जन्म पावतात, विकसित होत राहतात. त्यांचे पोषण करणारा रसिक वर्ग हा समाजाचाच एक भाग असतो. कलांचे इतिहास हे समाजेतिहासाचेच भाग ठरतात. तरी देखील कलेच्या इतिहासाची रचना समाजाच्या इतर घटितांवरून इतिहासरचनेपेक्षा विभिन्नच राहणार. यामुळेच गणन, वर्गिकरण, अवलोकन आणि अनुमान ही सामाजिक इतिहासाची सरधोपट पध्दती कलेच्या बाबतीत वर्ज्य ठरते.

वाङ्तमयेतिहासाचे स्वरुप हे अखेरत: वाङ्मयाबाबतच्या समाजाच्या गरजांवर अवलंबून असते. वाङ्मयाबाबतच्या या गरजा वाङ्मयाकडे पाहण्याची आपली दृष्टी नियंत्रित करतात. वाङ्मयाकडे पाहण्याची आपली दृष्टी अर्थातच स्वकालीन ज्ञान, सामाजिक—राजकीय—आर्थिक—सांस्कृतिक परिस्थिती आणि उपलब्ध विचारव्यूह यांना सीमित झालेली असते. वाङ्मयाबाबत स्वीकारलेला दृष्टिकोनच स्वरुप निश्चित करणारा असतो. हया परिस्थितीमुळेच वाङ्मयेतिहास पुन्हा पुन्हा नव्याने लिहिण्याची गरज सतत निर्माण होत असते. यामुळेच कोणताही वाङ्मयेतिहास वाङ्मयासंबंधीचे संपूर्ण सत्य आपल्यासमोर उभे करील असे म्हणता येत नाही. काळाच्या ओघात आपले ज्ञान वाढत जाते. त्यात परिवर्तन होत राहते. आपल्या सभोवतीची परिस्थिती बदलत असते. आपले विचारव्यूह पालटत असतात. या साऱ्या प्रक्रियेमुळे पूर्वीचीच तथ्ये आपल्या पदरात वेगळीच सत्ये टाकू लागतात. यामुळेच कोणताही वाङ्मयतिहास हा काही अखेरचा शब्द असत नाही. केवळ तथ्यांचा शोध घेणे, त्यांचे वर्गीकरण करणे याने वाङ्मयेतिहासकाराचे आव्हान संपुष्टात येत नाही. शोध, मांडणी, इ. पूर्ण झाल्यावर त्या तथ्यांची स्वमनात पूर्वनिश्चित केलेल्या एखाद्या सूत्रांच्या आधारे किंवा एखाद्या दृष्टिकोनातून संगती—विसंगती तपासून व्यवस्था लावणे, हे वाङ्मयेतिहासकराचे खरे कार्य असते. उदा. दलित साहित्यातील दलित कवितेचा विचार केला असता या कवितेच्या उठावामागे सामाजिक, सांस्कृतिक, बंडखोरीची पार्श्वभूमी लक्षात घेतली नाही तर दलित कविता समजणार नाही. तसेच महात्मा फुले यांच्या साहित्याचे अवलोकन केले असता शिक्षण न मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या अधोगतीचे दारिद्रयाचे स्वरुपच त्या साहित्यातून स्पष्ट झाल्याचे दिसते. म्हणूनच महात्मा फुले म्हणतात, ‘‘विद्ये विन मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली, गतीि वना वित्त गेले, वित विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले’’. हा महात्मा फुले यांचा संदेश म्हणजे क्रांतीकारक तर आहेच पण एक नवीन विचार मांडणारा आहे. पुष्यमित्र शृंगाच्या प्रतीक्रांतीपासून जवळपास २००० वर्षापासून एखाद्या मुक्या जनावराप्रमाणे राहणाऱ्या शुद्र—अतिशुद्र समुहाचा अडकलेला हुंकार मुक्त झाला तो केवळ या संदेशामुळेच. वाङ्मयेतिहासाची वर्गवारी करत असताना ही पार्श्वभूमीसुध्दा लक्षात घेतली पाहिजे. याप्रमाणेच१८८५ साली गो. ब. देवल यांनी सं.शारदा हे नाटक लिहिले. या नाटकाच्या माध्यमातून केवळ मनोरंजन नाही तर तत्कालीन समाजाचे उद्‌बोधन करणे हा हेतू होता हेही समजून घेतले पाहिजे. म्हणूनच साहित्याच्या इतिहासात कोणत्या घटना कधी घडल्या, कोणत्या काळात घडल्या, त्यांचा परिणाम कोणकोणत्या वैचारिक जीवन प्रणालींवर झाला. तसा तो साहित्यावरहीझाला. यासाठी वाङ्मयेतिहासाची आवश्यकता आहे.

## संदर्भसूची :

१) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरुप, प्रा.ह.री. शेणोलीकर
२) वाङ्मयेइतिहासाची संकल्पना, दत्तात्रय पुंडे
३) महाराष्ट्राची सत्वधारा, गो.म. कुलकर्णी, वि. त्र्यं. शेटे

४) मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप, गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर
५) अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये, ह.कि. तोडमल
६) साहित्याचे तत्वज्ञान, वि.ना. ढवळे
७) मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगावलोकन, रा. श्री. जोग
८) संत साहित्याचा वाङ्मयीन अभ्यास, सुहासिनी इर्लेकर
९) संत साहित्याचे समाजशास्त्रीय दृष्टिक्षेप, सदानंद मोरे
१०) यादवकालीन महाराष्ट्र, मु.गो.पानसे